# एनसीपीएच्या आर्ट गॅलरीत मेट्रो बांधकाम छायाचित्रांचे प्रदर्शन



**मुंबई** : कुलाबा-वांद्रे-सिप्झ मेट्रो ३ या संपूर्ण भुयारी मार्गिकेच्या बांधकामादरम्यानची थरारक छायाचित्रांच्या प्रदर्शनाचे उद्घाटन एनसीपीएच्या दिलीप पिरामल आर्ट गॅलरी येथे गुरुवारी करण्यात आले. केवळ मेट्रो ३ चे नव्हे तर शिवडी-न्हावा शेवा सागरी सेतू अर्थात ट्रान्स हार्बर लिंक प्रकल्प, सागरी मार्गाच्या छायाचित्रांचे प्रदर्शन १६ मार्चपर्यंत दुपारी १२ ते ८ या वेळेत पाहता येणार आहे.

मुंबईतील पहिल्या भुयारी मेट्रो मार्गाच्या बांधकामादरम्यानची चित्त थरारक दृश्य छायाचित्राच्या माध्यमातून पाहण्याची तसेच अभियांत्रिकी अविष्कार व प्रकल्पाची जटिलता समजून घेण्याची ही एक सुवर्णसंधी असल्याचे मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेडकडून स्पष्ट करण्यात आले आहे. या छायाचित्रांच्या प्रदर्शनात मेट्रो मार्ग-३ च्या छायाचित्र प्रदर्शनापासून या उपक्रमाला सुरुवात होत आहे. मेट्रो-३ वरील हे प्रदर्शन मुंबईकरांना ३ मार्च ते १६ मार्च २०२३ दरम्यान दुपारी १२ ते ८ या वेळेत पाहता येणार आहे.